# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
इमारत, मंत्रालय, मादाम कामा रोड, पहिला मजला, विस्तार हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई
कार्यालय दूरध्वनी:- ०२०-२६१२६३०७

## सामाजिक न्याय विभागा अंतर्गत देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांकरीता अर्ज मागविणेबाबत

समाज कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक यांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येते. सन २०२३-२०२४, या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. ज्या वर्षासाठी व ज्या पुरस्कारांकरीता अर्ज करण्यात येत आहे. त्या वर्षासाठी त्या पुरस्काराकरिता विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील. तसेच पुरस्कारासाठी दि. ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशी गणना विचारात घेण्यात येईल. (उदा. सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता पात्रतेचा कालावधी ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ असा विचारात घेण्यात येईल.

### सदर पुरस्कारांचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्काराचे स्वरुप | | पुरस्कारासाठी निवडीचे निकष (व्यक्ती) | पुरस्कारासाठी निवडीचे निकष (संस्था) |
|---|---|---|---|---|---|
| | | व्यक्ती | संस्था | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार | ५१ व्यक्तीना रु. १५ हजार (धनाकर्ष) | १० संस्थांना रु.२५ हजार एक (धनाकर्ष) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय जाती कल्याण, दिव्यांग कल्याण व समाज कल्याण क्षेत्रात १५ वर्षे वैयक्तीक अभिजात कार्य करणाऱ्या व्यक्ती | (१) समाज कल्याण क्षेत्रात मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शिक्षण ,आरोग्य, अन्याय निर्मूलन अंधश्रध्दा निर्मूलन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था<br>(२) संस्थेचे वरील समाज कल्याण क्षेत्रात १० वर्षाहून अधिक उल्लेखनीय कार्य आवश्यक<br>(३) संस्थेमध्ये कोणताही गैरव्यवहार नसावा.<br>(४) मागील ५ वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल आवश्यक. |
| २ | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार | २५ व्यक्तींना रु.२५ हजार (धनाकर्ष) | ६ संस्थाना रु.५० हजार (धनाकर्ष) | (१) मातंग समाजाकरीता कलात्मक, समाज कल्याण साहित्य, शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारे नामवंत. कलावंत साहित्यिक व समाज सेवक असावेत.<br>(२) वरील क्षेत्रात किमान १० वर्षे कार्य केलेले असावे<br>(३) व्यक्ती व संस्थेस एकापेक्षा अधिक वेळेस पुरस्कारास पात्र समजण्यात येणार नाही.<br>(४) महिला ३० टक्के पर्यंत असाव्यात.<br>(५) पुरस्कारासाठी फक्त मातंग समाजातील कलावंत व साहित्यिक व समाज सेवक यांचा विचार केला जाईल. | (१) समाज कल्याण क्षेत्रात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण ,आरोग्य, अंधश्रध्दा निर्मुलन जनजागृती इत्यादी क्षेत्रात कार्य करणारी संस्था.<br>(२) मातंग समाजाच्या कल्याणासाठी १० वर्षाहून अधिक मौलिक काम असावे.<br>(३) मातंग समाज सेवा व विकास या क्षेत्रात काम पाहून पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. |
| ३ | पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार | एका व्यक्तीला रु. २१ हजार एक (धनाकर्ष) | एका संस्थेला रु. ३० हजार एक (धनाकर्ष) | (१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील भूमीहिन, शेतमजूर व दुर्बल घटकांचे कल्याणासाठी झटणारे नामवंत समाज सेवक असावेत.<br>(२) सामाजिक क्षेत्रात कमीत कमी १५ वर्षे कार्य केलेले असावे<br>(३) एका व्यक्तीस एकापेक्षा जास्त पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.<br>(४) हा पुरस्कार मिळण्यास जात, धर्म,लिंग, क्षेत्र ह्या गोष्टींचा विचार केला जाणार नाही | (१) समाज कल्याण क्षेत्रात व अनु. जाती व नवबौध्द समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य अन्याय निर्मुलन. अंधश्रध्दा रुढी निर्मुलन. जनजागृती भूमीहिन शेतमजूर यांचे कल्याण इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थाना हा पुरस्कार दिला जाईल.<br>(२) वरील समाज कल्याण क्षेत्रात १० वर्ष कार्य असावे. विशेष मौलिक व भरीव काम करणाऱ्या संस्थेच्या बाबतीत अट शिथिल करण्यात येईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | संत रविदास पुरस्कार | एका व्यक्तीला रु .२१ हजार एक (धनाकर्ष) | एका संस्थेला रु. ३० हजार एक (धनाकर्ष) | (१) चर्मकार समाजाच्या व दलित समाजाच्या कल्याणासाठी झटणारे नामवंत समाज सेवक असावेत.<br>(२) सामाजिक क्षेत्रात कमीत कमी १५ वर्षे कार्य केलेले असावे.<br>(३) व्यक्तीस एकापेक्षा जास्त पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.<br>(४) लोकनियुक्त प्रतिनिधी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. | (१) समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य,अन्याय निर्मुलन अंधश्रध्दा रुढी निर्मुलन , जनजागृती इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थाना हा पुरस्कार दिला जाईल.<br>(२) वरील समाज कल्याण क्षेत्रात किमान १० वर्षाहून अधिक काळ कार्य केलेले असावे. विशेष मौलिक व भरीव काम करणाऱ्या संस्थेच्या बाबतीत अट शिथिलक्षम राहील. |

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार या पुरस्कारासाठी.

अ) व्यक्तीकरिता वयाची अट पुरुषांसाठी किमान ५० वर्ष आणि महिलांसाठी किमान ४० वर्ष राहील.

आ) या पुरस्कारासाठी संस्थांच्या बाबतीत - या संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम,१८६० अंतर्गत नोंदणीकृत असाव्यात आणि या संस्था राजकारणापासून अलिप्त असाव्यात.

(२) सर्व पुरस्कारासाठी शिफारशीच्या पध्दती पुढील प्रमाणे आहेत.

अ) व्यक्तीचे संपूर्ण जीवन चरित्र आ) विना दुराचार प्रमाणपत्र इ) गैर वर्तनाबाबत खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे प्रमाणपत्र ई) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केला नसल्याचे प्रमाणपत्र ड) संस्था व व्यक्ती यांनी केलेल्या विशेष कार्याचा तपशील.

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कारांची संख्या (संस्था) | पुरस्काराचे स्वरुप (शासकीय/अशासकीय संस्था) | पुरस्कारासाठी निवडीचे निकष (संस्था) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ५ | शाहू,फुले, आंबेडकर पारितोषिक | एकूण १२ पुरस्कार (सहा महसूल विभागातील प्रत्येकी दोन प्रमाणे १२ संस्था) | रु. ७.५० लक्ष (धनाकर्ष) सन्मानपत्र मानपत्रासाठी चांदीचा स्क्रोल स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ | १) राज्य शासनाच्या Ruls of Business अनुसार हा विभाग कार्यरत असला पाहिजे.<br>२) संस्थेने समाजातील अतिशय दुर्बल व मागासवर्गीय घटकातील व्यक्ती व समाजासाठी सेवा, शिक्षण आरोग्य, पुनर्वसन, रोजगार अशा व यासारख्या व्यक्तीगत व सामुहिक क्षेत्रामध्ये एकमेव अद्वितीय कार्य केलेले असले पाहिजे.<br>३) सदर संस्था संबंधित क्षेत्रात किमान मागील १० वर्षापासुन कार्यरत असणे आवश्यक आहे.<br>४) संबधीत संस्था ही मुंबई विश्वस्त नोंदणी अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीकृत असावी.<br>५) संस्थेची आर्थिक स्थिती बळकट असली पाहिजे.<br>६) संबंधीत संस्थेविरुध्द किंवा पदाधिकाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हा किंवा दंडात्मक कार्यवाही झालेली नसावी. |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार | राज्यस्तर - ३ विभागीयस्तर (महसूल विभागात प्रत्येकी ३ याप्रमाणे १८ पुरस्कार | राज्यस्तरीय पुरस्कार-३ प्रथम पुरस्कार रु. ५ लक्ष<br>द्वितीय पुरस्कार- रु.३ लक्ष<br>तृतीय पुरस्कार रु.२ लक्ष<br>विभागीय स्तर पुरस्कार-१८ प्रत्येक प्रवर्गामधुन उत्कृष्ट ठरलेल्या संस्थेस रु.१.०० लक्ष पारितोषिक देण्यात येते. | (१) अ) अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह .<br>ब) अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी निवासी शाळा/ आश्रमशाळा.<br>क) अनुसूचित जातीच्या मुलामुलींची अनुदानित वसतिगृहे<br>(२) प्रत्येक स्तरावर समितीने दिलेला निर्णय हा अंतिम राहील.<br>(३) संस्थांची तपासणी करुन समितीमार्फत अंतिम निर्णय घेण्यात येईल.<br>(४) पुरस्कारासाठी अंतिम निवडीच्या वेळी जर दोन्ही संस्थांना समान गुण मिळाल्यास चिठ्ठी पध्दतीने संस्थेची निवड करण्यात येईल.<br>(५) प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवणारी संस्था ५ वर्षे कालावधी पर्यंत पुन्हा पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.<br>(६) ज्या संस्थेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल झाले असतील किंवा शासकीय अनुदाचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले असेल अशा संस्था पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही.<br>कोणतीही संस्था एकाच वेळी दोन पारितोषिक मिळविण्यास पात्र राहणार असणार नाही. |

इच्छूक स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांनी पुरस्कारासाठी त्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे दिनांक १५/०२/२०२५ पर्यंत सर्व नमूद कागदपत्रांसह दाखल करावेत. अर्जाचा नमुना संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर पुरस्काराची जाहिरात व अर्जाचा नमुना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या https://sjsa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**( डॉ. हर्षदीप कांबळे )**
**प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**(ओम प्रकाश बकोरीया)**
**आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे**